पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक ३०/०७/२०१९

## पोलीस-नक्षल चकमकीत मृत माओवादीची ओळख पटली

काल दिनांक २९/०७/२०१९ रोजी उपविभाग गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या पोमके पोटेगाव हद्दीतील मौजा फुसेर-गरंजी जंगल परिसरात पोलीस दल व माओवादी यांच्यात झालेल्या चकमकीत एक महिला माओवादी ठार झाली होती.

सदर ठार झालेल्या महिला माओवाद्याची ओळख पटली असुन तिचे नाव सुशीला ऊर्फ रुपी महागु नरोटे रा. कोंईंदुर ता. एटापल्ली जि. गडचिरोली असुन ती सन २००७ मध्ये कसनसुर दलम मध्ये भरती होवुन सदस्यपदावर कार्यरत होती. त्यानंतर ती कंपनी क्र. १० मध्ये सदस्य म्हणुन कार्यरत होती. शासनाने तिच्यावर ४ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

